दिनांक 06/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.46

विषय – माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवकामी विविध कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 03/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने मागील वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या वर्षीही विटा नगरपरिषदेने माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सहभाग घेतलेला असून त्याकामी शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला जात असतो. त्याकामी शहरामध्ये गणेश विसर्जनकामी जलकुंड बसविणे, मंडप उभारणे, हार, फुले खरेदी करणे, जनजागृती करणे, पेपर प्रसिध्दी करणे, विविध बोर्ड तयार करणे, स्टीकर्स, पॉम्प्लेट तयार करणे, शाडूची मुर्ती बनविणे कार्यशाळा घेणे तसेच विविध प्रकारची तद्अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. तरी विटा शहरामध्ये माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवअंतर्गत गणेश विसर्जनकामी जलकुंड बसविणे, मंडप उभारणे, हार, फुले खरेदी करणे, जनजागृती करणे, पेपर प्रसिध्दी करणे, विविध बोर्ड तयार करणे, स्टीकर्स, पॉम्प्लेट तयार करणे, शाडूची मुर्ती बणविने, कार्यशाळा घेणे तसेच विविध प्रकारची तद्अनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-<br>
( डॉ.विक्रम बांदल )<br>
प्रशासक<br>
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 06/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 47

विषय – माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पर्यावरणपूरक घरगुती गौरी गणपती सजावट व पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा आयोजीत करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 03/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने मागील वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या वर्षीही विटा नगरपरिषदेने माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सहभाग घेतलेला असून त्याकामी शहरामध्ये पर्यावरणपूरक घरगुती गौरी गणपती सजावट व पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा आयोजीत करणे आवश्यक आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे, त्याचबरोबर परिसर स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबतची जनजागृती नागरीकांमध्ये करणे हा उद्देश आहे व तो उद्देश साध्य करणेसाठी शहरामध्ये पर्यावरणपूरक घरगुती गौरी गणपती सजावट व पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा आयोजीत करणे आवश्यक आहे. याकामी पर्यावरणपूरक घरगुती गौरी गणपती सजावट व पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे प्रोत्साहनपर बक्षिसे देणे आवश्यक आहे. तरी विटा शहरामध्ये नगरपरिषदेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान 5.0 व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पर्यावरणपूरक घरगुती गौरी गणपती सजावट व पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करून या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ घेणेत यावा.सदर स्पर्धेसाठी खालील प्रमाणे बक्षीस रक्कम देणेस मंजूरी देत आहे.याकामी पुढील आवश्यकती कार्यवाही करणेत यावी.

| **सार्वजनिक गणोशोत्सव स्पर्धा** | | | **घरगुती गणेशोत्सव स्पर्धा** | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुणानुक्रम | बक्षिस रक्कम | अ. क्र. | गुणानुक्रम | बक्षिस रक्कम |
| 1 | प्रथम | 11000/- | 1 | प्रथम | 3000/- |
| 2 | व्दितीय | 7000/- | 2 | व्दितीय | 2000/- |
| 3 | तृतीय | 5000/- | 3 | तृतीय | 1000/- |
| 4 | उत्तेजनार्थ -1 | 1000/- | 4 | उत्तेजनार्थ - 1 | 700/- |
| 5 | उत्तेजनार्थ -2 | 1000/- | 5 | उत्तेजनार्थ - 2 | 500/- |

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 06/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 48

विषय – नगरपरिषद हद्दीतील भवानीनगर मध्ये शिंदे घर ते सागर विलास शिंदे घर ते सुबराव खाशाबा शिंदे घरापर्यंत आर.सी.सी.गटर करणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 28/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) श्री.सुहास जगन्नाथ शिंदे व इतर – 10 यांचा दि.08/08/2024 रोजीचा अर्ज

नगरपरिषद हद्दीतील भवानीनगर मध्ये शिंदे घर ते सागर विलास शिंदे घर ते सुबराव खाशाबा शिंदे घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणेकामी तेथील नागरीकांची मागणी असून सदर ठिकाणचा स्थळपाहणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवाला प्रमाणे सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटरचे काम करणे आवश्यक आहे.गटरचे काम केलेने तेथील नागरीकांची सांडपाण्याची गैरसोय होणार नाही. त्यामुळे तेथील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार नाही.

तरी नगरपरिषद हद्दीतील भवानीनगर मध्ये शिंदे घर ते सागर विलास शिंदे घर ते सुबराव खाशाबा शिंदे घरापर्यंत आर.सी.सी.गटर करणेस मंजूरी देत आहे.सदरचे काम बांधकाम विकास शुल्क मधून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 06/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.49

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन नियमितपणे दर 3 वर्षातुन एकदा सेप्टीक टँक उपसा करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगर आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 05/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन नियमितपणे दर 3 वर्षातुन एकदा सेप्टीक टँक उपसा करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) हितेश असोसिएटस वडोदरा प्रति र.रू. 1,36,35,000/- तीन वर्षासाठी
2) काम फौंडेशन, पुणे प्रति र.रू. 1,32,97,500/- तीन वर्षासाठी

उपरोक्त ई निविदापैकी काम फौंडेशन, पुणे यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  06/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 50

विषय – विटा नगरपरिषदेसाठी सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराकामी Citizen engagement citizen impact  वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ-  मा.मुख्याधिकारी यांनी नगर आरोग्य निरिक्षक यांची दिनांक  05/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराकामी Citizen engagement citizen impact  वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर
2) बी.एल.पाटील ॲण्ड सन्स एन्टरप्रायजेस,अंबप
3) मलिक इलेक्ट्रीकल्स, विटा

उपरोक्त ई निविदापैकी दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा